प्रेसनोट दिनांक ०७/०४/२०२५

## सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून, चोरीचे ०५ गुन्हे उघडकीस एकुण ३,२८,०००/- रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत.

---

अ) सोलापूर शहरातील गर्दीचे ठिकाणी होणारे मोबाईल चोरीचे व मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेचे अनुषंगाने, गुन्हे शाखेकडील, सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार हे, दि.०१/०४/२०२५ रोजी, सोलापूर शहरात पेट्रोलींग करीत असताना, सपोनि शैलेश खेडकर यांचे पथकातील पोकॉ.विनोद रजपूत यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, " **एक इसम हा, चोरीची टी.व्ही.एस कंपनीची मोटार सायकल क्र. एम.एच.१३ ई.ए.-२८११ व होंडा अव्हेटर मोटार सायकल क्र. एम.एच.४२ ए.पी. ५०७१ अशा दोन मोटार सायकलीसह, ताना बाना चौक ते वल्याळ मैदानाकडे जाणारे रस्त्यावर लावून, त्या गाडया विक्री करण्यासाठी थांबलेला आहे.** " त्यानुसार, मिळाले माहिती प्रमाणे, सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने सदर ठिकाणी जावून, तेथे वर नमूद दोन मोटार सायकली सह मिळून आलेला इसम नामे- **अभिजीत महादेव पाटकुलकर वय- ४३ वर्षे, व्यवसाय :- मजूरी रा. करंदीकर बंगला, पंचायत समिती समोर, अशोक नगर बारामती** यास ताब्यात घेवून त्याचेकडे तपास केला असता, त्याचे ताब्यातील वर नमूद दोन्ही मोटार सायकली चोरीचे असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे, पोलीस पथकाने त्याचेकडून दोन मोटार सायकली जप्त केल्या आहेत.

ब) तसेच, सपोनि शैलेश खेडकर व पथकातील पोलीस अंमलदार हे दि.०३/०४/२०२५ रोजी सोलापूर शहरात मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत असताना, स.पो.नि शैलेश खेडकर यांचे पथकातील पोलीस अंमलदार राजकुमार पवार यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, " **गर्दीच्या विविध ठिकाणी चोरी केलेले मोबाईल विक्री करण्यासाठी एक इसम गंगामाई हॉस्पीटल जवळ येणार आहे.** " त्यानुसार, मिळाले माहिती प्रमाणे सपोनि शैलेश खेडकर यांचे पथकाने, सदर ठिकाणी जावून सापळा लावून, तेथे **विविध कंपन्याचे १६ मोबाईल फोन सह मिळून आलेला इसम नामे- युवराज गोरख कदम वय-४१ वर्षे, व्यवसाय :- मजुरी सध्या रा. अंबाबाई मंदिर जवळ, रामवाडी सोलापूर मुळ रा. गिरजणी, पोस्ट अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर** यास ताब्यात घेवून तपास केला असता, त्याने त्याचे ताब्यातील विविध कंपन्याचे मोबाईल फोन हे त्याने सोलापूर शहर, पंढरपुर, तुळजापूर अशा विविध गर्दीच्या ठिकाणांहून त्याने स्वत: चोरी केले असल्याबाबत कबूली दिली. त्याप्रमाणे पथकाने त्याचेकडून रु. १,७०,०००/- (एक लाख सत्तर हजार ) किंमतीचे, विविध कंपन्यांचे १६ ॲण्ड्राईड मोबाईल फोन हस्तगत केले आहे. त्यातील, ०२ मोबाईल फोन हे, सोलापूर शहरातून चोरले असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याबाबत, जेलरोड व सदर बझार पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत.

क) तसेच सपोनि शैलेश खेडकर व पथकातील पोलीस अंमलदार हे दि.०५/०४/२०२५ रोजी सोलापूर शहरात मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत असताना, स.पो.नि शैलेश खेडकर यांचे पथकातील पोकॉ. राजकुमार पवार यांना गोपनीय बातमीदारकडून माहिती मिळाली की, " **इसम नामे- ओंकार गायकवाड रा. स्वागत नगर, कुमठा नाका सोलापूर हा, त्याने गडडा यात्रेत चोरी केलेले सोन्याचे मंगळसुत्र विक्री करण्यासाठी अशोक चौक, सावरकर बगीचा परिसरात थोडया वेळाने येणार आहे.** " त्यानुसार, मिळाले माहितीप्रमाणे सपोनि शैलेश खेडकर यांचे पथकाने सदर ठिकाणी सापळा लावून, तेथे नमुद इसमास ताब्यात घेवून कौशल्याने तपास केला असता, त्याने त्याचे अंगझडतीत मिळून आलेले मंगळसुत्र गडडा यात्रेत गर्दीचे ठिकाणी चोरी केले असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे, पोलीस पथकाने त्याचेकडून रु.९३०००/- (त्र्यान्नव हजार ) किंमतीचे, मंगळसुत्र हस्तगत करुन पुढील प्रमाणे गुन्हा उघड केला आहे.

सपोनि/शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने, उघकीस आणलेल्या चोरीचे ०५ गुन्ह्यांची माहिती पुढील प्रमाणे :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | जप्त मुद्देमाल | किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | सदर बझार | १३/२०२५भा.न्या.सं.क.३०३(२) | एम.एच.१३ ई.ए. २८११ टी.व्ही.एस. एक्सल मोटार सायकल | ३५,०००/- |
| २ | बारामती शहर | १२८/२०२२ भा.द.वि.क.३७९ | एम.एच.४२ ए.पी.५०७१ होंडा अव्हेटर | ३०,०००/- |
| ३ | जेलरोड | ९९/२०२५ भा.न्या.सं.क.३०३(२) | एक विवो कंपनीचा मोबाईल फोन | १५,००/- |
| ४ | सदर बझार | १८१/२०२५भा.न्या.सं.क.३०३(२) | एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन | १५,०००/- |
| चोरीचे अभिलेख मिळून येतात अगर कसे? याबाबत पडताळणी चालू आहे, असे इतर १४ मोबाईल फोन- किंमत १,४०,०००/- | | | | |
| ५ | सदर बझार | ११४/२०२५भा.न्या.सं.क.३०३(२) | १७ ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र | ९३,०००/- |
| | | | एकुण किंमत | ३,२८,०००/- |

**अशाप्रकारे, स.पो.नि. शैलेश खेडकर व पथकाने वरील नमुद प्रमाणे, ०३ आरोपीतांना ताब्यात घेवून, विविध कंपन्यांचे चोरीचे एकुण १६ मोबाईल फोन, चोरीचे ०२ दुचाकी मोटार सायकली व चोरीचे एक सोन्याचे मंगळसुत्र असा एकुण ३,२८,०००/-रु. (तीन लाख अठठावीस हजार रुपये) किंमतीचा मुददेमाल हस्तगत करुन, एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.**

सदरची कामगिरी मा. श्री. एम.राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापुर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे/वि.शा., श्री.राजन माने, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे, श्री. सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेकडील नेमणुकीचे स.पो.नि. श्री. शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार- संदीप जावळे, विनोद रजपुत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काळे तसेच सायबर पो.स्टे कडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**